महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ 21 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 237 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# यशस्वी भव ! आज पासून दहावीची परीक्षा !!

## १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थी देणार परीक्षा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या माध्यमांतून राज्यभरात उद्या २१ फेब्रुवारी २०२५ पासून दहावीची परीक्षा सुरू होत आहे. तर परीक्षेला १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थी बसले आहेत. तर यामध्ये ८ लाख ६४ हजार १२० मुले, ७ लाख ४७ हजार ४७१ मुली, तर १९ ट्रान्सजेंडर परीक्षा देणार आहेत. अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली. तर २३ हजार ४९२ माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांची नोंदणी केली आहे. तर ५ हजार १३० मुख्य केंद्रांवर परीक्षा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शरद गोसावी म्हणाले, “उद्या होणाऱ्या दहावीच्या परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून राज्यातील ७०१ केंद्रांतील संपूर्ण स्टाफ बदलण्यात आला आहे. त्यामध्ये पुणे १३९, नाशिक ९३, नागपूर ८६, मुंबई १८, कोल्हापूर ५४, लातूर ५९ या विभागाचा समावेश करण्यात आला आहे. तर राज्यातील परीक्षा केंद्रावर जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराव्दारे निगराणी राहणार असल्याचे त्यांनी सांगितले

थोडक्यात महत्वाचे

## कसाऱ्यातील रेल्वे पुलाचे काम कासव गतीने

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी, (बातमीदार) :** कल्याण-कसारा मध्य रेल्वेवरील कसारा येथील ब्रिटिशकालीन पुलाची दुरुस्ती 14 एप्रिल 2025 रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती पूर्वी करावी जेणे करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मिरवणुकीत कोणताही अडथळा येणार नाही काळजी याची काळजी घेण्याचे आवाहन व मागणी राष्ट्रीय काँग्रेसचे कसारा विभागाचे अध्यक्ष रमाकांत पालवे यांनी जिल्हाधिकारी,मध्य रेल्वे अधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. कल्याण-कसारा रेल्वे मार्गावरील कसारा येथे जुना मुंबई-नासिक महामार्गाला जोडणारा रेल्वे लाईनवर पूल आहे.येथे कसारा गावातून पूर्व -पश्चिम अशी वहातूक ह्या पुलावरून होत असते.परंतु सदर ब्रिटीश कालीन पुलाची दुरवस्था होऊन तो पूल कमकुवत झाल्याने त्याची दुरुस्ती गेल्या दोन वर्षांपासून संथ गतीने सुरू असून येथील रस्ता बंद करण्यात आला असल्याने स्थानिक नागरिकांना 5/6किमीचा वळसा घालून कसारा बाजारपेठेत जावे लागत आहे.कसाऱ्यात दरवर्षी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 14 एप्रिल या जयंती दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर,तानाजी नगर,आनंद नगर ते मिलिंद नगर पर्यंत भव्य मिरवणुक काढण्यात येते. सदर मिरवणुकीत 15/16 हजारांच्या आसपास भीम अनुयायी उपस्थित असतातपरंतु गेल्या दिड-दोन वर्षापासून काम कासवगतीने सुरु आहे. सध्या त्या ठिकाणी गर्डरचे काम संथ गतीने सुरु केले असल्याने पूर्व-पश्चिमची मोठ्या गाडयांची वाहतुक बंद केली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांची व रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली आहे. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मिरवणुकीची सुरुवात होऊन मिलिंदनगर येथे सांगता होते त्या पुलाच्या कामामुळे मिरवणुकीत मोठी अडचण निर्माण हाऊ शकते. तरी पुलावरती गर्डर टाकण्याचे काम करून नागरिकांची वाहतुक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मिरवणुकीच्या मार्गात होणारी गैरसोय दुर करण्यात यावी अशी मागणी रमाकांत पालवे यांनी केली आहे.

## बदलापुरात केंद्र सरकारचा 'नक्शा' प्रकल्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर, ता. २० (बातमीदार) : नगर परिषद हद्दीतील मिळकतींचे अचूक भूमापन करून नकाशे व मिळकत पत्रिका तयार करण्यासाठी केंद्र सरकारने 'नक्शा' प्रकल्प सुरू केला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची सुरुवात आणि ड्रोन फ्लाइंग पहिल्यांदाच बदलापुरात करण्यात आले. मंगळवारी (ता. १८) कात्रप येथील श्रीजी इमारत येथील पालिकेच्या सभागृहात विधान परिषदेचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते या प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. या वेळी बदलापूरचे माजी नगराध्यक्ष राम पातकर यांनीदेखील या प्रकल्पाचे स्वागत केले.

या वेळी भूमी अभिलेखच्या विभागाकडून भूमापन आणि नकाशासाठी, अत्याधुनिक पद्धती अवलंबून ड्रोनच्या साह्याने सोप्या आणि अगदी कमी वेळात होणाऱ्या या प्रकल्पाची माहिती उपस्थितांना दिली. याप्रसंगी भूमी अभिलेख अधीक्षक बाबासाहेब रेडेकर, उपसंचालक अनिल माने, नगर परिषदेचे नगररचनाकार मुळे तसेच, इतर शासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सभागृहात या प्रकल्पाची माहिती दिल्यानंतर ड्रोन फ्लाइंगचे प्रात्यक्षिकदेखील सादर करण्यात आले.

## उल्हासनगर महापालिका आयुक्तांनी केली उद्यानांची पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर, ता. २० (वार्ताहर) : नागरिकांच्या अडचणी समजून घेण्यासाठी आणि शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. विशेष म्हणजे, सुट्टीच्या दिवशीही त्यांनी शहरातील महत्त्वाच्या उद्यानांना भेटी देत स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था आणि सुविधांची पाहणी केली.

त्यांच्या या कृतिशील दृष्टिकोनामुळे प्रशासनातील सकारात्मक बदलांचे वारे वाहू लागले आहे. स्थानिक नागरिकांनी त्यांच्या या तत्परतेचे कौतुक केले आहे. उल्हासनगर महापालिकेच्या कारभारात पारदर्शकता आणि नागरिकांसोबत थेट संवाद व्हावा, या उद्देशाने आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी बुधवारी (ता. १९) सुट्टीच्या दिवशीही शहरातील प्रमुख उद्यानांचा दौरा केला. राजीव गांधी उद्यान (सपना गार्डन), नेताजी गार्डन (प्रभात गार्डन), साई मंदिर शाह उद्यान (१०५ गार्डन), इंदिरा गार्डन आणि लाललूपी उद्यान यांची त्यांनी पाहणी केली.

या दौऱ्यात त्यांनी उद्यानांमधील स्वच्छता, तुटलेली खेळणी, खराब झालेली बेंचेस, नागरिकांना उपलब्ध असलेल्या मूलभूत सुविधांचा आढावा घेतला. तसेच सुधारणा करण्यासाठी अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. निरीक्षणादरम्यान आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी अधिकाऱ्यांना उद्यानांमधील स्वच्छता नियमित ठेवावी, लहान मुलांच्या खेळण्यांच्या सुविधा सुरक्षित कराव्यात, दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या सुविधा त्वरित कार्यान्वित कराव्यात, नागरिकांसाठी उत्तम बसण्याच्या सुविधा आणि हिरवाई राखली जावी, असे स्पष्ट निर्देश दिले. त्यांच्या या प्रत्यक्ष हस्तक्षेपामुळे प्रशासनाची गती वाढली असून, लवकरच शहरातील उद्यानांचे सौंदर्गीकरण होणार आहे.

## ठाण्यातील भाजप आमदारांचा जनता दरबार

### आमदार संजय केळकर आणि निरंजन डावखरे नागरिकांना भेटून समस्या सोडविणार





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी ठाण्यात शतप्रतिशत भाजपाची घोषणा करत जनता दरबार आयोजित केल्याने शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपच्या नेत्यांमध्ये शीतयुद्ध रंगले असतानाच, ठाण्यातील भाजपचे आमदार संजय केळकर आणि निरंजन डावखरे यांनीही आमदार आपल्या भेटीला उपक्रमांतून एकप्रकारे जनता दरबार भरविण्याचे ठरविले आहे. यामुळे मंत्री नाईक यांच्यापाठोपाठ आता ठाण्यातील आमदारांचाही जनता दरबार भरणार असल्याचे चित्र आहे. राज्यात भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) या तिन्ही पक्षांचे सरकार असले तरी ठाण्यात मात्र शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप नेत्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वादाच्या ठिणग्या उडू लागल्या आहेत. ठाणे येथील कोपरी भागातील कार्यक्रमात बोलताना वनमंत्री गणेश नाईक यांनी ठाण्यात शतप्रतिशत भाजपाची घोषणा केली. या घोषणेनुसार त्यांनी येत्या सोमवारी ठाण्यात जनता दरबार आयोजित केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला म्हणून ठाणे शहर ओळखले जाते. याठिकाणी नाईक हे जनता दरबार घेणार आहेत. यामुळे शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या नेत्यांकडून प्रतिक्रिया उमटल्या होत्या. त्याचबरोबर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नुकताच नवी मुंबईत पक्षाचा मेळावा घेतला होता. त्यात ‘मी जिथे उभा राहतो, तिथून जनसेवा सुरू होते, मी कधीही दरबारी राजकारण केले नाही’, असे विधान उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले होते. या विधानाच्या माध्यमातून त्यांनी नाईक यांना टोला लगावल्याची चर्चा होती. ठाण्यात भाजपकडून सदस्य नोंदणी तसेच जनता दरबारच्या माध्यमातून पक्ष ताकद वाढविण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असतानाच, शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या नेत्यांनी शहरात पक्षाचे मेळावे घेऊन आपली ताकद दाखविण्यास सुरूवात केली आहे. अशाचप्रकारे बुधवारी शिवसेनेच्या नेत्यांनी ठाण्यात एक बैठक घेऊन त्यात ठाणे महापालिका निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. असे असतानाच, ठाण्यातील भाजपचे आमदार संजय केळकर आणि निरंजन डावखरे यांनीही आमदार आपल्या भेटीला उपक्रमांतून एकप्रकारे जनता दरबार भरविण्याचे ठरविले आहे. खोपट येथील भाजप कार्यालयामध्ये दर सोमवार ते शुक्रवारी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० यावेळेत आमदार आपल्या भेटीला या उपक्रमाद्वारे आमदार केळकर आणि डावखरे हे नागरिकांना भेटून त्यांच्या समस्या सोडविणार आहेत.

## दोन मंत्र्यांची मंत्रीपदे धोक्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, दि. २० : महायुती सरकारचे विशेषता राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्या आलेल्या दोन खात्यांचे मंत्री वादाच्या चांगलेच बोऱ्यात सापडले असून एका मंत्राला न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा सुनावली आहे तर दुसऱ्या मंत्राच्या कथित पत्नीने त्याच्या विरोधात उपोषणाची धमकी दिली आहे यामुळे त्या दोघांचे मंत्रिपद जाते की काय याबाबत आता उत्सुकता निर्माण झाली आहे. माणिकराव कोकाटे यांच्या रुपाने अजित पवार गटाचा दुसरा मंत्री अडचणीत आला आहे. धनंजय मुंडे यांच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दुसऱ्या नेत्याचे मंत्रिपद संकटात सापडले आहे.

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांना 2 वर्षांचा कारावास आणि 50 हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. 1995 मधील एका प्रकरणात त्यांना ही शिक्षा सुनावण्यात आली. कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे अडचणीत आले आहेत. त्यांच्या आमदारकी आणि मंत्रीवर टांगती तलवार आहे. कारण लोकप्रतिनिधीला दोन किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांची शिक्षा झाल्यास त्याचे सभागृहाचे सदस्यत्व रद्द होते. तसे झाल्यास माणिकराव कोकाटे यांच्या राजकीय कारकीर्दीला ब्रेक लागू शकतो.

**1995 साली कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप आरोप माणिकराव कोकाटे यांच्यावर करण्यात आला होता. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी याबाबत याचिका दाखल केली होती. याबाबतचा गुन्हा नाशिकच्या सरकार वाडा पोलीस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आलेला होता. हे प्रकरण 1997 पासून सुरु होतं आणि आज या प्रकरणाचा निकाल लागलेला आहे. यामध्ये एकूण चार आरोपींना दाखवण्यात आलेले होते. त्यामध्ये माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या बंधूसह इतर दोघांचा समावेश होता. मात्र इतर दोन जणांबाबत कोर्टाने कुठल्याही स्वरूपाच्या शिक्षेची तरतूद केलेली नाही. मात्र माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू या दोघांना दोन वर्षाची शिक्षा आणि 50 हजारांचा दंड ठोठावण्यात आला आहे.**

दरम्यान, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना दोन तासांतच कोर्टाकडून जामीन मिळाला आहे. 15 हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर हा जामीन देण्यात आला. माणिकराव कोकाटे यांना जामीन मंजूर झाला असला, तरी त्यांना पुढील 30 दिवसांत सत्र न्यायालयात अपील करावे लागणार आहे. काही दिवसांपूर्वी धनंजय मुंडे-करुणा यांच्या प्रकरणात कौटुंबिक न्यायालयानं निर्णय दिला होता. करुणा यांच्या बाजूने हा निकाल देण्यात आला होता. यानंतर करुणा यांच्याकडून न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आलं होतं. धनंजय मुंडेंना कारणे दाखवा नोटीसही पाठवण्यात आली होती. मात्र, अद्याप कुठलीही कारवाई झाली नाही. बीड निवडणूक लढवताना प्रतिज्ञापत्रात कौटुंबिक आणि मालमत्तेसंदर्भात माहिती देताना ती चुकीची दिली होती, असा आरोप करतानाच त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी करुणा यांनी केली होती. या मागणीसाठी त्या मुंडेंविरोधात आझाद मैदानात उपोषणाला बसणार आहेत. अधिवेशनाआधीच करुणा उपोषणाला बसणार असल्याने मुंडेंच्या अडचणी वाढण्याची शक्यता असून, विरोधकांकडूनही त्यांना लक्ष्य केलं जाऊ शकतं.





## डी.वाय.फाऊंडेशनच्या उल्लेखनीय कार्याचा आमदार किसन कथोरेंकडून गौरव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** आज मुरबाड येथे डि वाय फाऊंडेशन च्या वतीने आयोजित केलेल्या महीला सक्षमीकरण व पोलीस प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप सोहळा कार्यक्रमासाठी आज मुरबाड तालुक्याचे आमदार किसन कथोरे साहेब नगराध्यक्ष संतोष चौधरी माजी सभापती दीपक पवार स्वरा चौधरी अनिल घरत सुरेश बांगर यांच्यासह अन्य उपस्थित होते. डि वाय फाऊंडेशन तर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमाला आमदार किसन कथोरे साहेब त्यांनी शुभेच्छा देऊन डि वाय फाऊंडेशन माध्यमातून होणाऱ्या सामाजिक काम हे उल्लेखनीय असून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद चोरघे त्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमात महिलांना व युवकांना महिला सक्षमीकरण प्रमाणपत्र व पोलीस किट चे वाटप करण्यात आले

## ठाणे मनपा निवडणुकीसाठी शिवसेनेची तयारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी ठाण्यात शतप्रतिशत भाजपाची घोषणा करत जनता दरबार आयोजित केल्याने शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप या मित्रपक्षात वादाच्या ठिणग्या उडू लागल्या असतानाच, शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या नेत्यांनी शहरात पक्षाचे मेळावे घेऊन आपली ताकद दाखविण्यास सुरूवात केली आहे. अशाचप्रकारे बुधवारी शिवसेनेच्या नेत्यांनी ठाण्यात एक बैठक घेऊन त्यात ठाणे महापालिका निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे निर्देश दिले असून यामुळे पालिका निवडणुकीच्या चर्चेने शहरात पुन्हा जोर धरला आहे. ठाणे महापालिकेची पंचवार्षिक मुदत तीन वर्षांपुर्वी संपुष्टात आली. तेव्हापासून पालिकेची निवडणुक झालेली नाही. यामुळे ठाणे महापालिकेचा कारभार प्रशासनामार्फत चालविण्यात येत आहे. विधानसभा निवडणुकीनंतर पालिकेच्या निवडणुका होतील अशी चर्चा आहे. परंतु फेब्रुवारी महिना संपत आला तरी निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. आता एप्रिल किंवा मे महिन्यात निवडणुका होतील असे अंदाज वर्तविले जात असतानाच, भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीची तयारी सुरू केल्याचे चित्र दिसून येत आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे शहरात भाजपच्या नेत्यांनी नुकतेच सदस्य नोंदणी अभियान राबविले. त्यापाठोपाठ भाजप नेते आणि राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी ठाण्यात शतप्रतिशत भाजपाची घोषणा करत जनता दरबार आयोजित केला आहे. तर, भाजपची ताकद असलेल्या नवी मुंबईतील ऐरोली भागात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षाचा नुकताच मेळावा घेतला. यामुळे शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप या मित्रपक्षात वादाच्या ठिणग्या उडू लागल्याचे चित्र आहे. असे असतानाच, शिवसेना (शिंदे गट) पक्षाने ठाणे महापालिकेच्या आगामी निवडणुकांची तयारी सुरू केली असून त्यासाठी पक्ष पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यास सुरूवात केली आहे

## गीतासार



न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् । कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ३-५ ॥

निःसंशयपणे कोणीही मनुष्य कोणत्याही वेळी क्षणभरसुद्धा काम न करता राहात नाही. कारण सर्व मनुष्यसमुदाय प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या गुणांमुळे पराधीन असल्यामुळे कर्म करायला भाग पाडला जातो. ॥ ३-५ ॥

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् । इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ ३-६ ॥

जो मूर्ख मनुष्य सर्व इंद्रिये बळेच वरवर आवरून मनाने त्या इंद्रियांच्या विषयांचे चिंतन करीत राहतो, तो मिथ्याचारी म्हणजे दांभिक म्हटला जातो. ॥ ३-६ ॥

यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन । कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ३-७ ॥

परंतु हे अर्जुना, जो मनुष्य मनाने इंद्रियांना ताब्यात ठेवून आसक्त न होता सर्व इंद्रियांच्या द्वारे कर्मयोगाचे आचरण करतो, तो श्रेष्ठ होय. ॥ ३-७ ॥

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः । शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ ३-८ ॥

तू शास्त्रविहित कर्तव्यकर्म कर. कारण कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे श्रेष्ठ आहे. तसेच कर्म न करण्याने तुझे शरीरव्यवहारही चालणार नाहीत. ॥ ३-८ ॥

## रेसिपी

### खानदेशी शेव भाजी



महाराष्ट्राच्या उत्तरेकडे दख्खनच्या पठारावर नि तापी नदीच्या खोऱ्यात वसलेला भूप्रदेश म्हणजे खान्देश. 'देश तसा वेश' असे आपण म्हणतो. तोच न्याय खाद्यसंस्कृतीलाही लागू होतो. ठसकेबाज अहिराणी भाषा, श्रमिक दिनचर्या आणि त्यालाच अनुरूप असे झणझणीत आणि झटकेदार खान्देशी जेवण. मसालेदार तिखट भाज्या, घट्ट वरण, लोणची, पापड, भजे, बोन्डे यांचे अनेक प्रकार येथे चाखायला मिळतात. चला तर मग आज जाणून घेऊया खानदेशी शेव भाजीची रेसिपी...

साहित्य -मध्यम आकाराचे जाड लाल शेव,३ टोमॅटो,२ कांदे,खोबरे, लसूण, कांदा यांचे वाटप,लाल तिखट,कोथिंबीर,हळद,कसुरी मेथी जीरे,लिंबू,चवीनुसार मीठ

कृती - सर्वप्रथम सुकं खोबरे, कांदा, लसूण पाकळ्या, आलं हे चांगले तेलात भाजून त्याचे वाटप बनवून घ्या.आता गॅस चालू करून एका कढईत तेल गरम करून त्यात जीरे, कढीपत्ता, हिंग ह्यांची फोडणी करून त्यात बारीक चिरलेला कांदा, २ बारीक चिरलेले टोमॅटो घालून तेलात लालसर परतवून वरील वाटप घालून तेलात चांगले परतवून घ्या. आता वरून हळद, लाल तिखट, कांदा लसूण मसाला, चवीनुसार मीठ घालून वाटप आला चांगले तेल सुटेपर्यंत परतवून घ्या.

आता त्यात आवश्यकते नुसार पाणी घालून मिश्रण एकजीव करून त्याला एक दोन उकळी येऊ द्या.

गॅस बंद करून वरून जाड लाल शेव घालून थोडी तर्री शेव मध्ये मुरली की मिनीटभरात सर्व्ह करा... गरमागरम झणझणीत खान्देशी शेव भाजी वरून बारीक चिरलेली कोथिंबीर घालून लिंबू पिळून पावासोबत सर्व्ह करा.

# अभिजात मराठी भाषा..

## जतन आणि संवर्धन




मराठी भाषेबाबत महाराष्ट्रात माता व बालक यांच्या मधील संवादाची जी बोलीभाषा असते तिलाच मराठी मातृभाषा संबोधले जाते. मराठी माणूस जेथे वस्ती करीत राहिले तेथे संवाद साधताना रोजच्या वापरात, व्यवहारात रूढ असलेली मराठी भाषा मातृभाषा प्रचलित झाली. अन त्याच भाषेत शालेय विद्यार्थी शिक्षण घेत, अभ्यास करीत, मराठी भाषेला समृद्ध करू लागले. प्रत्येक तालुका, जिल्हाच्या गावागावातून बोलीभाषा ऐकायला वेगळी वाटली, तरी बोललेली समजते, कळत असते. या भाषेत शब्दकोष भांडार विपुल आहे, हे मराठी वाड•मयाचा अभ्यास करताना आढळून येते. मराठी संत साहित्य याचा अभ्यास करताना भाषा विविध अलंकाराने नटलेली वाक्प्रचार, म्हणी यांच्या सौंदर्याने सजलेली समृद्ध अन आकर्षक अशी जाणवते.

अभिजात दर्जा प्राप्त झालेल्या या मराठी भाषेच्या समृद्धीसाठी मराठी सकल जणांनी मनापासून प्रयत्न केले पाहिजेत. शब्दांचे मतितार्थ अन् भाव, आशय समजून उच्चार करताना शब्द उच्चारले पाहिजे. व्याकरणाचा अभ्यास करून त्यातील बोलीतून येणारा भेसळपणा दूर केला पाहिजे. जनमानसात ती टिकून राहण्यासाठी चर्चा सत्रे, निबंध अन काव्य स्पर्धा, प्रश्न मंजुषा, शिबिरे, इत्यादी आयोजित करावयास पाहिजे, नुसतेच मराठी भाषा दिन साजरे करीत, पुढे गप्प राहून उपयुक्त नाही. अगदी शिशु वर्ग, पूर्व प्राथमिक, माध्यमिक ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समाविष्ट करून अभिजात मराठी भाषेचा प्रचार अन् प्रसार करायला पाहिजे. बक्षिसे, शिष्यवृत्ती अन् पुरस्कार, पारितोषिके आयोजित करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले पाहिजे. दानशूर प्रायोजक यांना सहभागी करून निरंतर कार्यक्रम राबविले पाहिजे. शासन दरबारी भाषेचे महत्व अधोरेखित करीत तिचा वापर व्यवहारात वाढविणे गरजेचे आहे.

राज्यातील इंग्रजी भाषा माध्यमाच्या शाळा, महाविद्यालयांमधून मराठी भाषेला डावलून हद्दपार करू नये, म्हणून सर्वांनीच जागरूक राहायला पाहिजे. शासनाच्या सर्वच विभागातून अन् मंत्रालयीन कामकाज, तसेच न्यायालयीन स्तरावरील कामकाज काटेकोरपणे मराठी भाषेतून होते किंवा कसे हे दक्ष राहून पाहायला हवे. सर्वच स्तरावर भाषा विकासाचे, समृद्धीचे शर्थीचे प्रयत्न करताना आताच्या तरुण पिढीतील युवक-युवतींना मराठी ग्रंथालये, आध्यात्मिक साहित्य, संत साहित्य वाड•मय व इतर अवांतर वाचनाकडे वळविले पाहिजे तरच अभिजात मराठी भाषेला उत्कर्षांचे दिवस मिळाल्याचे आपणा सर्वांना पाहावयास मिळेल, असे जाणवते.

आपली अभिजात मराठी भाषा ही स्वतःच्या भाषिक सौंदर्यावर ठाम उभी आहे, तिला इतर कोणत्या भाषिकांनी नव्हे तर सुशिक्षित अन सुसंस्कृत मराठी माणसांनीच भक्कम आधार देणे गरजेचे आहे. स्वतंत्र लिपी, स्वर, व्यंजन, वर्ण, व्याकरणाच्या नियमांनी ती बद्ध आहे. विविध विषयावर साहित्य संपदा विपुल असून आपल्या महाराष्ट्र मधील लोकांची लोकभाषा आहे. प्राचीन काळातील शिलालेख यावर ही मराठी कोरीव अक्षरे, उत्खननाच्या वेळेस इतिहासकार तज्ञांना संशोधनात त्याबाबतचे पुरावे मिळालेले आहेत.

मराठी माणसांनीच जाणीवपूर्वक प्रयत्न करून आपल्या अपत्यांना, पाल्यांना वाचन संस्कृती चे महत्व विषद करून भाषेचे संस्कार रुजविले पाहिजे. ही सुरुवात प्रत्येक घराघरातून व्हायला हवी. त्यांची भाषेबाबतची गोडी वाढवायला हवी. जितकी मराठी अस्मिता आपण त्यांच्यामध्ये जागृत ठेवू, तितका अभिजात मराठी भाषेचा स्तर व अभिमान वाढतच राहील. उच्च अभिरुची अन् उच्च दर्जा असणारी अभिजात मराठी भाषा ही प्रत्येकास स्वतःच्या आईइतकीच प्राणप्रिय असायला हवी. मराठी भाषेच्या समृद्धीची आणि विकासाची जबाबदारी आपल्या सर्व मराठी समाज बांधवांची आहे, एवढेच नव्हे तर ते प्राधान्याने आद्य कर्तव्य समजून जाणीवपूर्वक सजगतेने आपापल्या परीने प्रयत्न करीत आपल्या या अभिजात मराठी भाषेला वैभवाचे दिवस येण्यासाठी सतर्क अन् जागरूकच राहायला पाहिजे, असे मला अभ्यासू प्रवृत्ती, वाचनाअंती मनापासून कळकळीने जाणवते !!!

मराठी भाषेमध्ये प्रभावी लेखन आपल्या पूर्वसूरींनी अजरामर करून साहित्यात पूर्वापार त्यात पिढीगणिक लेखकांनी भर घालून वाचकांसाठी अमोल नजराणाच ठेवलेला आहे, अन् प्रत्येक मराठी ग्रंथालये यामध्ये विपुल ग्रंथसंपदा आजवर तेथील व्यवस्थापक यांनी अमूल्य ठेवा आपला सर्व प्रयत्नांनी जतन करून ठेवलेला आहे, वाचकप्रिय वाचकांसाठी कायम उपलब्ध करून दिला आहे. तिथे स्वतः जाऊन वाचकांनी वाचण्याचा आस्वाद घ्यायला हवा, अन् आपल्या पाल्यांना तेथे त्यांच्यासोबत जाऊन भेटी द्यायला पाहिजे. त्यांनाही त्यामुळे वाचनाची आवड निर्माण होऊन गोडी लागेल अन ज्ञान समृद्ध होतील, अशी आशा जाणवते.

निरनिराळी विषयांवरील पुस्तकांच्या वाचनाने बुद्धीची भूक शामवली जाते अन् व्यक्ती सकारात्मकतेने विचार करण्यास प्रवृत्त होतो. विचारांना आखीव रेखीव दिशा मिळून खंबीरता प्राप्त होते. अन् निर्णयक्षम होऊन कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्यास सज्ज होतो. यासाठीच पालकांनी न कंटाळता अपत्यांकडून पुस्तकाचे वाचन करून घेतले पाहिजे. पुस्तकाने मानवाचे मस्तक हे सशक्त होत असते. सशक्त झालेले मस्तक कधीच कुणाचे हस्तक होत नसते. अन् हस्तक न झालेले मस्तक कुणापुढे नतमस्तकही होत नसते. लोक स्वतःहून वाचन संस्कृती जपत वाचनालयाकडे वळतील, तेथील पुस्तके वाचतील तरच स्वबुद्धीच्या बळावर स्वतःचे प्रश्न सोडवू शकतील. देशाचे भवितव्य, नाव उज्वल तर होईलच, प्रगतीही कोणी रोखू शकणार नाही. यासाठी तरी भाषेचे संस्कार मनस्वी सर्व पालकांनी आपल्या पाल्यांच्या मनावर रुजविले पाहिजे, असे मला अनुभवांती सांगावेसे वाटते.

लेखन
सौ.मीना घोडविंदे (वनगे), साहित्यिका, ठाणे
(8451997915)

## वालधुनी पुलावर धावत्या दुचाकीला आग



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : कल्याणातील वालधुनीपुलावर धावत्या बाईकने गुरूवारी दुपारी पेट घेतल्याची घटना घडली. या पेट घेतलेल्या बाईकचा वाहतूक पोलिसांने व्हिडीओ काढीत इतर वाहनांची वाहतूक थांबण्याच्या सूचना करीत असल्याचे व्हायरल व्हिडीओ मध्ये दिसत असून उष्णतेचा वाढता चटका त्य त धावत्या बाईकने पेट घेतल्याची घटना आणि घबरलेल्या बाईक चालकाने बाईक तिथेच टाकून पोबारा केल्याचे समजते. सुदैवाने या घटनेत जिवित हानी झाली नाही.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# केडीएमसी मुख्यालयासमोर प्राणीमित्र युवतीचा ठिय्या

### श्वानावर चुकीच्या पध्दतीने उपचार करीत असल्याचा केला आरोप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या केंद्रात श्वानांवरती चुकीच्या पद्धतीने उपचार केले जातात. त्यामुळे त्यांना अनेक व्याधींनी पछाडले जातात. यांत अनेक श्वानांचा आतापर्यंत बळी गेला आहे. यामुळे संतापलेल्या प्राणी मित्र हिर राजपूत हिने गुरुवारी दुपारी पालिका मुख्यालयात जखमी श्वानासह पालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावर ठाण मांडले. या जखमी श्वानांना वाचवण्यासाठी पालिका प्रशासनाने तातडीने कारवाई करावी या मागणीसाठी तिने आक्रोश केला. या ठिय्या आंदोलनामुळे प्रशासकीय आधिकारी , सुरक्षारक्षक विभाग सह पोलीस यंत्रणेला घटनास्थळी धाव घ्यावी लागली.

केडीएमसी प्रशासन आरोग्य विभागाच्या मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आश्विनी शुक्ला, उप आयुक्त प्रसाद बोरकर, संजय जाधव यांनी प्राणी मित्र कल्याणात राहिवाशी हिर राजपूत यांची श्वानां संदर्भीत कैफियत ऐकून घेत समजूत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु आयुक्तांशी भेट घेऊन आतापर्यंत आपण केलेला पत्रव्यवहारा संदर्भात प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे त्यांना सांगून ठोस आश्वासन घेतल्याशिवाय ठिय्या आंदोलन मागे घेणार नाही असा पावित्रा घेतला. तासाभराच्या या घाडामोडी अंती बाजार पेठ घटनास्थळी पोहचले त्यांनी देखील तिचे म्हणणे ऐकून घेत समजविण्याचा प्रयत्न केला.

सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार पशुवैद्यकीय आधिकारी यांनी तिथे येऊन सांगितले की, भटक्या बेवारस कुत्र्यांचे निबिर्जीकरणाचे काम एपीएमसी मार्केट शेजारील श्वान निबिर्जीकरण केंन्द्रात योग्य ती देखभाल करीत केले जाते. व्याधीग्रस्त श्वानावर खाजगी रूग्णालयात उपचार करू शकता अशी माहीती दिली. अखेर प्राणी मित्र युवतीची समजूत काढण्यात प्रशासनाला यश आले.

# अनधिकृत बांधकामांचे रजिस्ट्रेशन सुरूच

### शिवसेना ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे यांनी घेतली पोलीस उपायुक्तांची भेट संबंधितांवर कारवाईची मागणी



**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामांमुळे शासनाचा व नागरिकांचा आर्थिक तसेच कायदेशीर फसवणुकीचा प्रश्न निर्माण झाला आहे.**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील अनधिकृत इमारतींचा विषय गाजत असताना देखील या अनधिकृत इमारतींचे रजिस्ट्रेशन होत असल्याचा धक्कादायक खुलासा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख दिपेश म्हात्रे यांनी केला. यासंदर्भात दिपेश म्हात्रे यांनी पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे यांची भेट घेत निवेदन देऊन संबंधितांवर कारवाईची मागणी केली. यावेळी कल्याण जिल्हा संघटक तात्या माने, शहर प्रमुख सचिन बासरे, अभिजीत सावंत, प्रकाश तेलगोटे आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे उभी राहत असून, यामुळे शासनाचा व नागरिकांचा मोठा आर्थिक तसेच कायदेशीर फसवणुकीचा प्रश्न निर्माण झाला आहे. तलाठी, तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्या खोट्या सही व शिक्क्यांचा वापर करून बनावट परवानग्या तयार करण्यात आल्याचे उघड झाले होते. यामुळे शासनाची दिशाभूल झाल्याने शासनामार्फत दोन गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्या पार्श्वभूमीवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामां मधील सदनिकांच्या नोंदणी वर बंदी घातली होती.

परंतु, ही बंदी असतानाही काही भ्रष्ट अधिकारी मोठ्या प्रमाणावर लाच स्वीकारून अनधिकृत बांधकामांमधील सदनिकांची नोंदणी करत असल्याचा आरोप दिपेश म्हात्रे यांनी केला आहे. या प्रकारामुळे शासनाची दिशाभूल होऊन नागरिकांची फसवणूक होत आहे. तरी या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची व कायदेशीर कारवाई करावी. तसेच, सर्व अनधिकृत नोंदण्या त्वरित रद्द करून भविष्यात अशा प्रकारची फसवणूक होणार नाही, यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याची मागणी दिपेश म्हात्रे यांनी केली आहे.

### शिवशंभु मराठा प्रतिष्ठान आयोजित

# म्हारळमध्ये भव्य शिवजन्मोत्सव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

"शिवशंभु मराठा प्रतिष्ठान" आयोजित शिवजयंती महोत्सव दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी १९ फेब्रुवारी २०२५ रोजी उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात येत आहे. प्रतिष्ठानने म्हारळ गावामध्ये शिवजन्मोत्सव २०१७ पासून सर्व ग्रामस्थांना बरोबर घेऊन उत्साहात व विविध सांस्कृतिक कार्यक्रम, शिवव्याख्याने, आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर असे विविध सामाजिक कार्यातून साजरा करत येत आहे. प्रतिष्ठानच्या पुढाकाराने व गावातील सर्व ज्येष्ठ-कनिष्ठ तसेच सामाजिक, राजकीय, उद्योजक, महिला भगिनी यांच्या मदतीने गावामध्ये विठ्ठल नगर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे "भक्ती - शक्ती" स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व जगतगुरु संत तुकाराम महाराज यांच्या भेटीचे एक 'भव्य - दिव्य' असे स्मारक उभे करून गावामध्ये महाराजांप्रती एक आदर्श उभा केला आहे. शिवशंभु मराठा प्रतिष्ठान सर्व सुशिक्षित युवा व महिला कार्यकर्त्यांचा एक मोठा फौजफाटा घेऊन गावात तसेच गावाच्या बाहेर देखील सामाजिक कार्य करण्यासाठी नेहमी सज्ज असतो. प्रतिष्ठान आता "शिवजन्मोत्सव २०२५" भव्य - दिव्य, उत्साहात, जल्लोषात साजरा करण्यासाठी सज्ज झाला आहे. प्रतिष्ठानने यावर्षी गावदेवी मंदिर म्हारळ येथे महाराजांचे नेत्रदीपक असे सेट अप उभे करण्यास सुरुवात केली आहे जे खूपच सुंदर व अप्रतिम असेल. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानने यावर्षी शिवजयंती निमित्त "शिवशाहीची ललकार - लोककला आणि शिवगीतांचा नृत्य-नाट्य-संगीतमय अविष्कार" या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण आणि सादरकर्ते असतील महाराष्ट्राचे सुप्रसिध्द अष्टपैलू युवा लोककलावंत, TV स्टेज कलाकार, पिंगळा फेम लोकगायक "शिवपाईक योगेश माणिकराव चिकटगावकर". या कार्यक्रमासाठी गावदेवी मंदिर म्हारळ येथे हजारोंच्या संख्येने शिवभक येतील असे प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. शिवशंभु मराठा प्रतिष्ठान गेल्या ९ वर्षापासून या ठिकाणी भव्य आणि दिव्य स्वरूपात समाजातील अठरा पगड जातीला व शाहू फुले आंबेडकरांच्या विचाराने सर्वांना एकत्र आणून शिवजन्मोत्सव साजरा करत आला आहे आणि यापुढेही अशाच प्रकारे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यास प्रतिष्ठान कटिबद्ध राहील. प्रतिष्ठानच्या वतीने या कार्यक्रमासाठी संपूर्ण पंचक्रोशीतील शिवभक्तांना आग्रहाचे निमंत्रण देण्यात येत आहे.

### टिटवाळा- खडवली दरम्यान

# मालगाडीचे कपलिंग तुटल्याने रेल्वे वाहतूक विस्कळीत

कल्याण : मध्य रेल्वेच्या टिटवाळा-खडवली दरम्यान गुरुवारी सकाळी ८:३० ते ९ वाजण्याच्या सुमारास मालगाडीचे कपलिंग तुटल्याने डाऊन दिशेने जाणारी संपूर्ण रेल्वे वाहतूक ठप्प झाली. या बिघाडामुळे मुंबईहून कसारा आणि पुढील मार्गावर जाणाऱ्या सर्व लोकल आणि एक्सप्रेस गाड्या तासभर उशिराने धावत होत्या. परिणामी, प्रवाशांचे हाल झाले तर चाकरमान्यांचे वेळापत्रक कोलमडले. या खोळंब्याचा सर्वाधिक फटका नियमित लोकल प्रवाशांना बसला. अप आणि डाऊन मार्गावरील गाड्या विलंबाने धावत असल्याने मुंबईच्या दिशेने येणाऱ्या लोकलही वेळापत्रकाबाहेर धावत होत्या. अनेक चाकरमानी कार्यालयात पोहोचण्यास उशीर झाल्याने अस्वस्थ झाले. या गोंधळाचा परिणाम केवळ नोकरी करणाऱ्या प्रवाशांवरच नाही, तर परीक्षेसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांवरही झाला.

इयत्ता १२ वीच्या बोर्ड परीक्षेसाठी अनेक विद्यार्थी सकाळच्या सत्रासाठी रेल्वेने परीक्षा केंद्रांकडे जात होते. मात्र, गाड्या वेळेत न आल्याने विद्यार्थ्यांना तणावाचा सामना करावा लागला. अनेक विद्यार्थी किमान अर्धा ते एक तास उशिराने परीक्षागृहात पोहोचले, ज्यामुळे त्यांचा वेळ वाया गेला.

कल्याण-कसारा रेल्वे पॅसेंजर वेल्फेअर असोसिएशनचे सचिव उमेश विशे यांनी परिस्थितीची गंभीर दखल घेत, प्रवाशांच्या सोयीसाठी मेल आणि एक्सप्रेस गाड्यांना तात्पुरता थांबा देण्याची मागणी केली. या मागणीनंतर "गरीब रथ मेल" ला थांबा देण्यात आला, तसेच प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी १०:०३ वाजता मुंबईकडे जाणारी स्लो लोकल जलद करण्यात आली. या प्रकारामुळे मध्य रेल्वे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वारंवार होणाऱ्या तांत्रिक बिघाडांमुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने वेळीच उपाययोजना करावी, अशी मागणी प्रवासी संघटनांकडून केली जात आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# संसद भवन ते सेंट्रल विस्टा' पुस्तकाचे प्रकाशन

## शरद पवार, शिवराज पाटील चाकूरकर, संजय राऊत यांची उपस्थिती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

दैनिक सामना चे दिल्ली ब्युरो चीफ पत्रकार नीलेशकुमार कुलकर्णी यांनी लिहलेल्या 'संसद भवन ते सेंट्रल विस्टा' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उदया (ता.२०) ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पूर्वसंध्येला रंगणार आहे. राष्ट्रादी कांगेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन राजधानीतील नवीन महाराष्ट्र सदनात सायंकाळी सहा वाजता होणार आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) संसदीय पक्षाचे नेते खासदार आणि दैनिक सामना चे कार्यकारी संपादक संजय राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. लोकसभेचे माजी अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. पंजाबचे कृषी सचिव अजित जोशी (आयएएस), लक्ष्मीकांत खाबिया यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमाला असेल.

भारतीय राज्यघटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पत्रकार नीलेशकुमार कुलकर्णी यांनी हे पुस्तक लिहले असून, यात भारतीय लोकशाहीच्या इतिहास व वर्तमानाचा धांडोळा घेण्यात आला आहे.

संसद भवन ते सेंट्रल विस्टा या पुस्तकात देशाच्या लोकशाहीचा प्रवास चितारण्यात आला आहे. संसद भवनाचा इतिहास, ऐतिहासिक घटनाक्रमस संसदेतील ऐतिहासिक भाषणे, आजवरच्या पंतप्रधानांनी देशासाठी दिलेले योगदान, पंतप्रधान निवडीवेळी पडद्याआड रंगलेले राजकारण, लोकसभा सभापतींनी उमटवलेला ठसा, महाराष्ट्रातील नेत्यांनी दिल्लीच्या राष्टीय राजकारणात उमटविलेल्या कार्यकर्तृत्वाच्या मुद्रा, संसदेतील काही हळुवार मिश्कील प्रसंग काही कटू प्रसंग या पुस्तकातून रेखाटलेले आहेत.

श्री. संजय राऊत यांनी या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहली असून, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी लोकसभा अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी या पुस्तकासाठी अभिप्राय लिहला आहे. पुण्याच्या अनासपुरे पब्लिकेशन कंपनीने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. महाराष्टातील अनेक लोकप्रतिनिधी, साहित्यिक, विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी आणि दिल्लीतील मराठी जनांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या नामांतराची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

कोल्हापूर येथील 'शिवाजी विद्यापीठ' या नावात 'छत्रपती शिवाजी महाराज' यांचा अपूर्ण व एकेरी उल्लेख असल्याने अनेक वर्षांपासून शिवभक्त आणि हिंदू संघटनांद्वारे संताप व्यक्त होत आहे. काही शहरे, रेल्वेस्थानक, विमानतळ आणि अन्य ठिकाणी दिलेली छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची नावे नंतर आदरयुक्त करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाचे नाव 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ' असे आदरयुक्त स्वरूपात करण्याची आग्रही मागणी हिंदु जनजागृती समितीकडून कोल्हापूर शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे 20 फेब्रुवारीला आंदोलनाद्वारे राज्य सरकारकडे करण्यात आली. या आंदोलनास प.पू. कालीचरण महाराज यांची वंदनीय उपस्थिती होती. याचसमवेत श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, विश्व हिंदु परिषद, हिंदू महासभा, हिंदू एकता आंदोलन, सनातन संस्था, महाराष्ट्र मंदिर महासंघ, पतित पावन संघटना, बाल हनुमान तरुण मंडळ, शिवसेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट यांसह विविध हिंदुत्वनिष्ठ संघटना, तरुण मंडळे यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले ''छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ इतिहासातील एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व नसून, महाराष्ट्राच्या अस्मितेचे आणि स्वाभिमानाचे तेजोमय प्रतीक आहे. त्यांच्या नावाचा अपूर्ण वा एकेरी उल्लेख करणे, हा त्यांच्या कार्याचा अवमान आहे. वर्ष 1962 साली घेतलेला निर्णय अंतिम असू शकत नाही. 60 वर्षांपूर्वीची कारणे आजही ग्राह्य धरता येणार नाहीत. आता समाजातील जनभावना, ऐतिहासिक महत्त्व आणि शासनाच्या आताच्या निर्णयांची दिशा लक्षात घेऊन हा बदल आवश्यक आहे. यापूर्वी अनेक ऐतिहासिक संस्थांची नावे सुधारली गेली आहेत. वर्ष 1996 मध्ये 'व्हिक्टोरिया टर्मिनस' चे नामकरण 'छत्रपती शिवाजी टर्मिनस' करण्यात आले. नंतर वर्ष 2017 मध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस' असा संपूर्ण नावाचा उल्लेख करण्यात आला. तसेच 'औरंगाबाद' चे केवळ 'संभाजीनगर' नाव न ठेवता ते 'छत्रपती संभाजीनगर', अशी नावे बदलण्यात आली आहेत. याच धर्तीवर शिवाजी विद्यापीठाचे नावही 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ' करणे आवश्यक आहे. असे नामकरण करण्यास जर कोणी विरोध करत असेल, तर ते धक्कादायक आहे. यामुळे दुर्दैवाने शिवाजी विद्यापीठ हे पुरागाम्यांचे अड्डा बनलाय का ? असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित होतो.

ज्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव प्रत्येक जण आदराने घेतो त्या छत्रपतींच्या नावाचा एकेरी उल्लेख करून 'शिवाजी कोण होता ?', असे कॉ. पानसरे यांचे पुस्तक कसे काय विक्री होते ? त्यामुळे 'शिवाजी कोण होता ?' या पुस्तकाचे नाव त्वरित पालटावे, अशी मागणी आम्ही शासनाकडे करणार आहोत.

# टीडीएफच्या अध्यक्षपदी सागर पाटील

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



कोकण विभागीय शिक्षक लोकशाही आघाडीची बैठक नुकतीच रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्या सेवक सहकारी पतपेढी मर्यादित पेन या ठिकाणी राज्य कार्याध्यक्ष नरसू पाटील व राज्य सहसचिव रोहित जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाली.या बैठकीमध्ये कोकण विभागीय शिक्षक लोकशाही आघाडीची पुढील पाच वर्षासाठीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. कोकण विभागीय टीडीएफच्या अध्यक्षपदी रत्नागिरी जिल्हा टीडीएफचे अध्यक्ष व रत्नागिरी माध्यमिक पतपेढीचे चेअरमन सागर पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली.कार्याध्यक्ष पदी पालघर चे राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त संतोष पावडे तर सचिव पदी रायगड माध्यमिक पतपेढीचे चेअरमन व सुधागड शिक्षण संस्थेचे सदस्य राजेंद्र पालवे यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला कार्याध्यक्ष नरसू पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सभेल सुरुवात करण्यात आली. यावेळी सभाध्यक्ष नरसू पाटील यांनी आपल्या मनोगतातून टीडीएफ चा इतिहास उपस्थित पदाधिकाऱ्यांसमोर मांडला. शिक्षण क्षेत्राला आज टीडीएफ ची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यकारणी पदाधिकारी पुढील प्रमाणे उपाध्यक्षपदी मायकल घोंसालविस (वसई), रमेश म्हात्रे (रायगड), अंबर घोलप (ठाणे), अविनाश पाटील (रत्नागिरी), अजय शिंदे (सिंधुदुर्ग) , सहसचिव पदी सुशांत कविस्कर (रत्नागिरी), विजय मयेकर (सिंधुदुर्ग) ,कोषाध्यक्षपदी सुरेंद्र शिंदे (ठाणे), संघटक पदी गणेश प्रधान (पालघर), संभाजी देवकते (रत्नागिरी), महिला प्रतिनिधी म्हणून अर्चिता कोकाटे (रत्नागिरी) व मीनल गायकवाड (पालघर)यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून रुपेश वझे,(डहाणू ),रमाकांत गावंड (रायगड), सचिन मिरगल (रत्नागिरी), अशोक गीते (सिंधुदुर्ग) यांची निवड करण्यात आलेली आहे.स्वीकृत सदस्य म्हणून के डी पाटील (पालघर), भालचंद्र नेमाडे (मीरा-भाईंदर) व विनोद पन्हाळकर (रायगड )यांचा समावेश कोकण विभागीय शिक्षक लोकशाही आघाडीच्या कार्यकारणी मध्ये करण्यात आलेला आहे.

या सभेमध्ये उपस्थित सर्व कोकण विभागीय शिक्षक लोकशाही आघाडीचे सभासद व पदाधिकारी यांनी महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीचे राज्य अधिवेशन कोकण विभागातील पालघर जिल्ह्यामध्ये घेण्यात यावी अशी मागणी राज्याचे कार्याध्यक्ष नरसु पाटील व सहसचिव रोहित जाधव यांच्याकडे केली असून राज्य संघटनेने त्याला मान्यता दिली असल्याने यावर्षी महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीचे राज्य अधिवेशन पालघर या ठिकाणी संपन्न होणार आहे.

**कोकण विभागाची प्रादेशिक रचना लक्षात घेता उर्वरित महाराष्ट्र प्रमाणे शैक्षणिक धोरणे कोकण विभागाला लागू करता येणार नाहीत.कोकण विभागासाठी स्वतंत्र शैक्षणिक धोरण राबविणे आवश्यक आहे, हे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी कोकण विभागीय टीडीएफच्या माध्यमातून प्रामुख्याने प्रयत्न केले जाणार आहेत. तसेच विभागातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये सन्माननीय शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) यांच्यासोबत सह विचार सभा घेऊन जिल्ह्यातील शिक्षकांचे प्रश्न जिल्हास्तरावर मार्गी लावण्यासाठी कोकण विभागीय टीडीएफ प्रयत्नशील राहणार आहे.**

**- सागर पाटील (अध्यक्ष)**
**कोकण विभागीय शिक्षक लोकशाही आघाडी**

# वातावरणीय बदलाने शहरी आरोग्य बिघडले

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : वातावरणाच्या लहरीपणामुळे कधी गारठा, तर कधी उकाडा असा अनुभव सध्या मुंबईकरांना येत आहे. ऐन थंडीच्या कालावधीत विषम हवामानामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या तक्रारींमध्येही वाढ होऊ लागली आहे. सर्दी, खोकला आणि विषाणूजन्य संसर्गच्या तक्रारी घेऊन नागरिक दवाखान्यांत जात आहेत. कडाक्याच्या उन्हामुळे उष्माघाताचा धोकाही वाढला आहे. मागील काही दिवसांपासून मुंबईत पहाटे गारवा तर दुपारी उन्हाचा तडाखा सहन करावा लागत आहे. जानेवारी महिन्यातही काहीशी अशीच परिस्थिती होती. मुंबईकरांना यंदा दरवर्षीसारखा गारठा अनुभवता आलेला नाही. थंडीच्या हंगामात फारच कमी वेळा १३ ते १६ अंशादरम्यान किमान तापमान नोंदले गेले. याउलट किमान तापमानही अनेकदा वाढतच गेले होते. किमान आणि कमाल तापमानामुळे वातावरणात सातत्याने बदल होत असून मानवी आरोग्यावरही त्याचा परिणाम होत आहे.

# उरण शहरासाठी पर्यावरणपूरक शवदाहिनी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उरण :** उरण नगरपरिषदेकडून पहिलाच वायुवरील शवदाहिनी प्रकल्प उभारण्यात आला आहे. एक कोटी खर्चाच्या वायू शवदाहिनी प्रकल्पामुळे वेळ, पैशाचीही मोठ्या प्रमाणावर बचत होणार आहे. पर्यावरणाचे रक्षण, प्रदूषणाला पर्याय ठरणारा प्रकल्प अद्यापही उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे. मात्र या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून महिनाभरात हा प्रकल्प सुरू होईल असा दावा उरण नगर परिषदेने केला आहे.

उरण नगरपरिषदेने शहरातील बोरी येथे उभारलेल्या एक कोटी खर्चाच्या प्रकल्पामुळे नागरिकांचा वेळ, पैशाचीही मोठ्या प्रमाणावर बचत होणार असून पर्यावरणाचे रक्षण



व प्रदूषणाला पर्याय ठरणार आहे. मात्र परिसरातील नागरिकांना शवदाहिनी कार्यान्वित होण्याची प्रतीक्षा लागून राहिली आहे. उरण शहरवासीयांसाठी पर्यावरणपूरक वायुवर चालणारी शवदाहिनी बोरी स्मशानभूमीत उभारण्यात आली आहे. सुमारे एक कोटी रुपये खर्च करून उभारलेला वायूवर आधारित शवदाहिनी प्रकल्प लाकडांवर जळीत करण्यामुळे होणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील प्रदूषणाला पर्याय ठरणारा आहे. त्याशिवाय नाममात्र दराच्या आकारणीमुळे पैशांचीही मोठ्या प्रमाणावर बचत होणार आहे.

उरण शहराची लोकसंख्या ३५ हजारांहून अधिक आहे.त्यातच परिसरातील वाढत्या औद्योगिक पसाऱ्यामुळे लोकसंख्येत वाढ चालली आहे. त्यामुळे वाढत्या वाहतुकीमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. अपघातातील आणि बेवारस मृतदेहाच्या दहनाचा ताणही उनपला सोसावा लागत आहे. तशी शहरातील लोकसंख्येच्या तुलनेत शहरात बोरी,भवरा, मोरा अशी तीन ठिकाणी स्मशानभूमीची व्यवस्था आहे. दररोज रात्री- अपरात्री मृतदेहांचे दहन करण्यासाठी स्मशानभूमीत येणाऱ्या मृतदेहांची विल्हेवाट लावण्यासाठी मृतांच्या नातेवाईकांना लाकूडफाटा उपलब्ध करून देण्याचे काम उरण नगर परिषदेला करावे लागते.

> **नगर परिषदेच्या माध्यमातून वायू शव दाहीनेचे काम पूर्ण झाले असून वायूवाहिनीची जोडणीही देण्यात आली आहे. हा प्रकल्प महिनाभरात कार्यन्वित करण्याचे प्रयत्न सुरु आहे. - निखिल दोरे, अभियंता, उरण नगर परिषद**

# होळी सणाठी कोकण रेल्वेच्या विशेष गाड्या

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : कोकण पट्ट्यात शिमगा आणि गणेशोत्सव या सणांना विशेष महत्त्व आहे. मुंबईस्थित कोकणवासीय होळीनिमित्त कोकणातील मुळगावी जाण्याच्या तयारीत आहेत. मुंबईस्थित कोकणवासीयांची रेल्वेगाडीचे तिकीट आरक्षित करण्यासाठी लगबग सुरू आहे. कोकणात जाणाऱ्यांची संख्या लक्षात घेऊन मध्य आणि कोकण रेल्वे मार्गावरून विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचे नियोजन केले आहे.

होळीनिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वे आणि कोकण रेल्वेच्या समन्वयाने रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. सीएसएमटी – मडगाव, एलटीटी – मडगाव अशा रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. कोकण रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ०११५१ सीएसएमटी – मडगाव विशेष रेल्वेगाडी सीएसएमटीवरून ६ मार्च, १३ मार्च रोजी मध्यरात्री १२.२० वाजता सोडण्यात येणार आहे. ही रेल्वेगाडी अनुक्रमे ७, १४ मार्च रोजी दुपारी १.३० वाजता मडगाव येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०११५२ मडगाव – सीएसएमटी विशेष रेल्वेगाडी मडगाव येथून ६ मार्च, १३ मार्च रोजी दुपारी २.१५ वाजता सोडण्यात येणार असून ही रेल्वेगाडी त्याच दिवशी मध्यरात्री ३.४५ वाजता सीएसएमटीला पोहोचेल.

या रेल्वेगाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड आणि थिवी या रेल्वे स्थानकांवर थांबा असेल. या रेल्वेगाडीला एकूण २४ डबे असतील. प्रथम श्रेणीचा एक डबा, प्रथम आणि द्वितीय श्रेणीचा एकत्र एक डबा, द्वितीय श्रेणीचे दोन डबे, तृतीय श्रेणीचे १० डबे, शयनयान चार डबे, जनरल चार डबे, एसएलआरचे दोन डबे असतील.

गाडी क्रमांक ०११२९ लोकमान्य टिळक टर्मिनस – मडगाव १३ मार्च, २० मार्च रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून रात्री १०.१५ वाजता सुटेल. ही रेल्वेगाडी अनुक्रमे १४ मार्च आणि २१ मार्च रोजी दुपारी १२.४५ वाजता मडगाव येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०११३० मडगाव – लोकमान्य टिळक टर्मिनस विशेष रेल्वेगाडी १४ मार्च, २१ मार्च रोजी मडगाव येथून दुपारी १.४० वाजता सुटेल. ही रेल्वेगाडी २२ मार्च रोजी पहाटे ४.०५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. या रेल्वेगाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवी आणि करमळी स्थानकांवर थांबा असेल. या रेल्वेगाडीला एकूण २० डबे असतील. प्रथम श्रेणीचा एक डबा, द्वितीय श्रेणीचे दोन डबे, तृतीय श्रेणीचे सहा डबे, शयनयानचे आठ डबे, पॅन्ट्री कारचा एक डबा, जनरेटर कारचे दोन डबे असतील. या रेल्वेगाड्यांचे तिकीट आरक्षण २४ फेब्रुवारी रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि आयआरसीटीसी या संकेतस्थळावर सुरू होईल, अशी माहिती कोकण रेल्वेद्वारे दिली.


## बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) रत्नागिरी सिंधुदुर्ग

महाराष्ट्र शासन

**अंगणवाडी सेविका व मदतनीस रिक्त मानधनी पदभरती २०२५**

**जाहिरात**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागअंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) रत्नागिरी सिंधुदुर्ग, जि, रत्नागिरी या प्रकल्पांतील रत्नागिरी जिल्ह्यातील रिक्त असलेल्या **०५ सेविका व १३ अंगणवाडी मदतनीस पदांची** , मानधनी तत्वावर भरती करावयाची आहे.

| अ.क्र. | नगरपरिषद/ नगपंचायत नाव | रिक्त पदांची संख्या सेविका | मदतनीस | अंगणवाडीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | दापोली | ० | १ | मदतनीस -वडाचा कोड |
| २. | गुहागर | २ | १ | सेविका- १.कुंभार वाडी, २.किर्तन वाडी. मदतनीस - देवपाट |
| ३. | देवरुख | ० | १ | मदतनीस- खालची आळी |
| ४. | मंडणगड | ० | २ | मदतनीस -आदर्श नगर , कोंझर गावठाण |
| ५. | खेड | ० | १ | मदतनीस- महात्मा फुले नगर |
| ६. | रत्नागिरी | ३ | १ | सेविका- १.खडपेवठार, २.मुरुगवाडा पांढरासमुद्र ३. मिरकरवाडा (उर्दू) मदतनीस - मांडवी |
| ७. | राजापुर | ० | २ | मदतनीस-१.चर्मकार बौध्दवाडी, २.मुस्लिम मोहल्ला (उर्दू) |
| ८. | लांजा | ० | ४ | मदतनीस- १.कुवे पुरागाव,२. पश्चिम रेस्ट हाऊस, ३. पुर्व रेस्ट हाऊस, ४- देवराई |
| | एकुण | ०५ | १३ | |

वरिल **एकुण ५ सेविका व १३ मदतनीस या पदांसाठी** नागरी क्षेत्रातील उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रकल्पाच्या नागरी क्षेत्राबाहेरील उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, तसेच अपात्र उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात येतील व त्याबाबत त्यांना कोणत्याही स्वरुपात लेखी कळविण्यात येणार नाही. जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन अंतिम दिनांकापर्यंत अर्ज प्रत्यक्ष कार्यालयात शासकीय सुट्टी सोडून सादर करावेत. तसेच **पोष्टाने किंवा कुरीअरने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. प्रत्यक्ष कार्यालयात येऊन अर्ज सादर करावे.**

**जाहिरात प्रसिध्दी -२०.०२.२०२५ अर्ज करावयाची अंतिम दिनांक ०६.०३.२०२५ सायंकाळी ०५.४५ पर्यंत**

पात्रता - १) **वय** -१८ ते ३५ वर्षे ( विधवा उमेदवार करिता वयोमर्यादा १८ ते ४० वर्षे), २) **शिक्षण** - किमान १२ वी उत्तीर्ण किंवा त्यापेक्षा अधिक, ३) शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील .४. लहान कुटुंबांचे प्रमाणपत्र बंधनकारक राहील,

अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदाच्या सरळ नियुक्ती संदर्भात आवश्यक शैक्षणिक पात्रता, अटी व शर्ती बाबत http://ratnagiri.gov.in व http://ratnagiri.nic.in या संकेत स्थळावर पदभरतीची जाहीरात प्रसिध्द करण्यात आली आहे.तसेच अर्जाचा नमुना सदर संकेस्थळावर उपलब्ध आहे.

**अर्ज मिळण्याचे व जमा करण्याचे ठिकाण**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) रत्नागिरी सिंधुदुर्ग यांचे कार्यालय.**
पत्ता - काशिकृपा बिल्डींग , जेल रोड रत्नागिरी जि. रत्नागिरी.
दुरध्वनी क्रमांक -०२३५२-२७००६५

(श्रीकांत ज्ञा. हावळे)
बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी) रत्नागिरी सिंधुदुर्ग



## बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी ठाणे, जि. ठाणे

महाराष्ट्र शासन

### अंगणवाडी मदतनीस पदासाठी जाहिरात

बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी ठाणे, जि.ठाणे या प्रकल्पा अंतर्गत कार्यरत अंगणवाडीतील रिक्त पदे असलेल्या अंगणवाडी मदतनीस यांची मानधनी पदे भरती करावयाची आहेत. **अबंरनाथ, बदलापुर, शहापुर व मुरबाड नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रातील** स्थानिक रहिवासी महिला उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सविस्तर रिक्त जागांचा तपशील, तसेच अटी व शर्ती अर्जासोबत नमूद आहेत.

महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६ मंत्रालय मुंबई दि.२ फेब्रुवारी २०२३ व महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. एबावि-२०२२/प्र.क्र.१७५/का. ६ मंत्रालय मुंबई दि.२७ फेब्रुवारी २०२४ व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक ०३/०९/२०२४ चे आदेश निर्णयानुसार दिलेल्या अटी व शर्ती नुसार सबंधित नगरपरिषद / नगरपचांयत क्षेत्रातील मदतनिस रिक्त पद भरावयाची आहेत. त्यासाठी आवेदन पत्र मागविण्यात येत आहेत.

**-: पात्रतेचे निकष :-**

| | | |
|---|---|---|
| १ | पदाचे नाव | अंगणवाडी मदतनीस (मानधनी सेवा) |
| २ | मदनीस रिक्त जागेचे क्षेत्र | अंबरनाथ नगरपरिषद -८ पदे व बदलापुर नगरपरिषद-१ पद आणि शहापुर नगरपंचायत २ पदे व मुरबाड नगरपंचायत १ पद. |
| ३ | एकत्रित मानधन | दमाह रूपये ७५०० /- |
| ४ | शैक्षणिक पात्रता | अंगणवाडी मदतनीस पदासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ वी उत्तीर्ण व (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) मराठी भाषाविषयासह अर्हता उर्तीण असणे आवश्यक अशी शैक्षणिक पात्रता राहील. |
| ५ | रहिवाशाची अट | उमेदवार हा रकाना क्रमांक २ मधील सबंधित नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रातील रहिवाशी असणे आवश्यक आहे. |
| ६ | वयाची अट | जाहीरात प्रसिध्दिच्या दिनांकास किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे आणि विधवा उमेदवारासाठी वयोमर्यादा कमाल ४० वर्षे राहील. |
| ७ | लहान कुंटूब | वरील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारास लहान कुंटूबाची अट लागू राहील. उमेदवारास दोन पेक्षा जास्त अपत्ये नसावीत तसे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| ८ | अर्जाचा नमुना कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते ५.०० पर्यंत उपलब्ध राहिल. बाल विकास प्रकल्प कार्यालय नागरी ठाणे.जि.ठाणे. शिवधाम सोसायटी, मा पार्वती बिल्डिंग, तळ मजला, रुम क्रंमाक जी 3/4, सिब्बु पॅलेस हॉटेलच्या पाठीमागे, अंबरनाथ पुर्व, अबरनाथ. जिल्हा ठाणे. | |

अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक जाहिरात प्रसिध्द केल्यापासून १० दिवस कार्यालयीन कामकाजाचे वेळेत राहिल,

सही/-
(सुधीर साळवी)
बाल विकास प्रकल्प अधिकारी
नागरी ठाणे, जि. ठाणे

* जावक क्रमांक
विमाका /क्रोवि/२०२४-२०२५/३३८

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# तीन प्रवाशांवर चाकूने हल्ला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : कल्याण वरून दादरला जाणाऱ्या फास्ट लोकलमध्ये ट्रेन मधून उतरण्याच्या वादातून तीन प्रवाशांवर एका प्रवाशाने चाकूने हल्ला केला. हातावर बोटावर चाकूने हल्ला केला, यात अक्षय वाघ, हेमंत कांकरिया, राजेश चांगलानी हे तीन प्रवासी जखमी झाले आहेत. जखमी प्रवाशांनी कल्याण वरून दादरला जाणारी फास्ट लोकल पकडली. या लोकलमध्ये शेख जिया हुसेन, हा 19 वर्षीय प्रवासी डोंबिवली वरून बसला होता. शेख जिया हुसेन याला मुंब्रा मध्ये उतरायचे होते मात्र ही लोकल फास्ट असल्याने ती मुंब्र्याला थांबत नाही असे प्रवाशांनी त्याला सांगितले. हुसेन शेख हा उतरण्याचा प्रयत्न करत असताना त्याला

## इच्छित स्थळी उतरू न दिल्याने केला हल्ला

एका प्रवाशाचा धक्का लागला आणि वाद सुरू झाला. या वादात जिया शेख याला काही प्रवाशांनी मारहाण करण्यास सुरुवात केली.

मात्र जिया जवळ असलेल्या चाकूने त्याने प्रवाशांवर हल्ला केला. यात तीन प्रवासी जखमी झाले. जियाने लोकलमध्ये गोंधळ घातला. आरोपी शेख जिया हुसेन याला डोंबिवली लोहमार्ग पोलिसांनी ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करत घटनेचा तपास सुरू केला असल्याची माहिती डोंबिवली लोहमार्ग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण उंद्रे यांनी दिली.

## संक्षिप्त

# डोंबिवलीत शहरात श्री संत गजानन महाराज प्रगट दिन साजरा





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली: प्रतिनिधी संत श्री गजानन महाराज यांचा प्रगट दिवस हा माघ वद्य सप्तमी रोजी असतो, त्यांचे औचित्य साधून महाराष्ट्र सर्वत्र ठिकाणी प्रगट दिनानिमित्त धार्मिक उत्सव संपन्न होत असतो. त्याप्रमाणे डोंबिवली पूर्व येथील श्री गजानन महाराज उपासना केंद्रात मोठ्या प्रमाणावर संपन्न झाला.त्यावेळी, गजानन महाराज पोथीचे सामुदायिक पारायण व नामस्मरण, काकड आरती,भजन इत्यादी धार्मिक उत्सव संपन्न झाले.त्याचप्रमाणे डोंबिवली येथे ज्ञानेश्वर मंगल कार्यालय, ब्राह्मण सभा, शास्त्री हॉल येथे देवस्थळीबंधु ,अनेक भक्तांनी घर आपापल्या घरी प्रगट दिनानिमित्त धार्मिक उत्सव साजरे केले.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन



(जिल्हाधिकारी मा. अशोक शिनगारे यांनी घेतली मागण्यांची दखल)

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण : राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने आज राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयांवर धरणे आंदोलन करण्यात आले आहे. कोकण विभागातर्फे आज ठाणे जिल्हाधिकार्यालयावर जोरदार ओबीसी धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांचा जोर लावून घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडला. अखेर जिल्हाधिकारी यांनी चर्चेसाठी बोलावले असता ओबीसींच्या विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी मा. शिंनगारे यांना देण्यात आले यावेळी झालेल्या चर्चेत मा.सहायक कलेक्टर भालचंद्र ठाकरे यांनी जातनिहाय जनगणना लवकरात लवकर झाली पाहिजे अशा प्रकारची मागणी केली. तर राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे कोकण विभाग अध्यक्ष एकनाथ तारमळे यांनी शासनाचे परिपत्रक 28 फेब्रुवारी 2023 रोजी निघाले असतांना २ वर्षे उलटून गेले, तरी ओबीसी विद्यार्थ्यांना ठाण्यात वस्तीगृहाची सोय उपलब्ध करून दिली जात नाही. विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्याचबरोबर, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुद्धा वर्ष संपत आले तरी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात अजूनही पैसे जमा झाले नाहीत. ६०० विद्यार्थी मर्यादा असतांना १११ विद्यार्थीच वैध ठरविण्यात आले आहेत. त्या संदर्भातल्या अनेक तक्रारींचे निवेदन अशोक विशे यांनी केले. तसेच, ओबीसी, भज, विजा, विमाप्र विद्यार्थ्यांचे आर्थिक व शैक्षणिक नुकसान होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. महाज्योती संस्थेचे एकमेव कार्यालय नागपूर येथे असून उपविभागीय कार्यालय कोकण विभागासाठी ठाणे शहरात सुरू करण्याची विनंती यावेळी अरूण मडके यांनी केली. तसेच, हॉस्टेल साठी ऐरोली व कल्याण या ठिकाणी जागा न शोधता मध्यवर्ती शहर असलेल्या ठाणे शहरातच हॉस्टेलची निर्मिती त्वरित करावी. अशा प्रकारची मागणी विश्वनाथ म्हात्रे यांनी केली. यावेळी या धरणे आंदोलनावर पोलीस दबाव टाकत असतांना मिलिंद मडके यांनी दबावाला बळी न पडता आंदोलन चालूच राहील. असा सूचक इशारा देण्यात आला. ओबीसी शिष्टमंडळाच्या सर्व मागण्या जिल्हाधिकारी यांनी शांतपणे समजावून घेतल्या व लवकरच या संदर्भात मिटींग लाऊन हे विषय मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. यावेळी ओबीसी कार्यकर्ते व ओबीसी बांधव शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ठाण्यातून अशोक विशे, नारायण विशे, किसन बोंद्रे, दशरथ हरड, पी. एन. पाटील,गुरूनाथ पाटील,सुधाकर जाधव शहापूर येथून एकनाथ तारमळे, अरुण मडके, अपर्णा खाडे,कल्पना तारमळे,अनिल निचिते, प्रकाश गोंधळी,मधुकर शिंदे, प्रकाश सांडे, वसंत भेरे,बबन भेरे,श्रीमती विशे, संदीप वागे, भिवंडी वरून विश्वनाथ म्हात्रे, सुनील पाटील, रमेश मुकादम, रामचंद्र देसले, मुरबाड वरून प्रकाश पवार, उमेश पाटील, मिलिंद मडके, सोपान गोल्हे, तर कल्याण वरून विश्वनाथ जाधव, जनार्दन पाटील, नरेश भोईर व इतर अनेक ओबीसी बांधव उपस्थित होते.

# बाळशात्री जांभेकरांना महापालिकांतर्फे अभिवादन

## कडोंमपात बाळशास्त्री जांभेकरांना आदरांजली

मराठी पत्रकारितेचे जनक, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचा जयंती दिन आज कल्याण महापालिकेत संपन्न झाला. महापालिका मुख्यालयात शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या समयी उपस्थित उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) संजय जाधव, महापालिका सचिव किशोर शेळके,शिक्षणाधिकारी विजय सरकटे ,माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सहा. सुरक्षा अधिकारी सुरेश पवार तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन अभिवादन केले.



## भिवंडी मनपात बाळशास्त्री जांभेकरांना आदरांजली




शासन परिपत्रक व भिवंडी महानगरपालिका मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांच्या निर्देशानुसार दि.२०/०२/२०२५ रोजी बाळशात्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावरील सभागृहात भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते बाळशात्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमप्रसंगी शहर अभियंता श्री. जमील पटेल, उपायुक्त रोहिदास दोरकुळकर, श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, शैलेश दोंदे, प्रणाली घोंगे डॉ. अनुराधा बाबर महानगरपालिकेचे सर्व सहाय्यक आयुक्त, विभाग प्रमुख, कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# अंबरनाथमध्ये बेकायदा होर्डिंगवर कारवाईचा सुरु



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : नगरपरिषदेची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे रस्त्यावर, चौक, उद्यानं, मोक्याचे ठिकाण या ठिकाणी बेकायदेशीरपणे होर्डिंग लावण्या साठी उभारलेले फ्रेम्स, लोखंडी , बांबु यांच्यावर निष्कासन कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. अतिक्रमण विभागाने शहरातील पूर्व आणि पश्चिम या भागातील विनापरवानगी बॅनर काढून त्यांचे प्रेम लाकडी व लोखंडी काढण्याची कारवाई सुरू झालीय.

शहरातील संपूर्ण बॅनर व फ्रेमवर मुख्याधिकारी अभिषेक पराडकर यांनी मिळकत विभाग व अतिक्रमण विभागाकडून संयुक्त कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहे. शहरात कोणीही नगरपालिकेच्या परवानगीशिवाय जाहिरात व तत्सम मजकुराचे बॅनर्स होर्डिंग्ज लावू नये. घाटकोपर सारख्या होर्डिंग च भयंकर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, आपले शहर आपण सुंदर ठेवण्याचा प्रयत्न करावा. जेणेकरून नगरपरिषदेस आपणावर कारवाईची वेळ येऊ नये असे आवाहन अतिक्रमण विभागाचे प्रमुख नरेंद्र संखे यांनी शहरवासीयांना केले आहे.

# भावानेच केली भावाची हत्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील काटेमानेवली परिसरात बुधवारी रात्री एकाची गोळ्या घालून निर्घृण हत्या झाल्याची खळबळजनक घटना घडली. कल्याणपूर्वेतील काटेमानेवली परिसरात उत्तर प्रदेश येथील जमिनीच्या वादातून बुधवारी रात्री चुलत भावाने चुलत भावाची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. कुटुंबात गावच्या जमिनीवरुन वाद होता. याच वादातून राम सागर यांनी आपला चुलत भाऊ रणजीत दुबे याला निर्घृणपणे संपवले. तर याप्रकरणी कोळसेवाडी पोलीसांनी अवघ्या 5 तासात आरोपीला अटक केली आहे.

कल्याण पूर्वेत राहणाऱ्या दोन चुलत भावांचा उत्तर प्रदेश येथील जमिनीवरून वाद सुरू होता. याच वादातून कल्याण पूर्व येथील नाना पावशे चौक परिसरातील घटना घडलेल्या घटनेत आरोपी राम दुबे यांने प्रथम चाकूने मयत रणजित दुबे याच्या वर हल्ला केला. नंतर पिस्तूलाने गोळी झाडत हल्ला केला. या हल्यात रणजित यांचा मृत्यू झाला. कल्याण पूर्व खडगोलवली परिसरात रणजित दुबे आपल्या कुटुंबासह राहत होते. दुबे कुटुंबाची उत्तर प्रदेश येथे जमीन आहे. या जमिनीवरून रणजित दुबे यांचा त्याचा चुलत भाऊ राम दुबे यांच्याशी वाद सुरू होता. अनेकदा या दोघांमध्ये भांडण देखील झाले होते.

बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास राम दुबे यांने रणजीत दुबे याला नाना पावशे चौक परिसरात एकट्यात गाठले. रणजित दुबे आणि राम दुबे यांच्यात वाद झाला. राम दुबे याने रणजीतवर चाकू हल्ला करत नंतर पिस्तूलाने गोळया झाडल्या. या गोळीबारात रणजीत याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी कोळशेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल करीत आरोपी राम दुबे याला जेरबंद केले.

हि कारवाई पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे व सहा. पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे वपोनिरी गणेश न्हायदे, पो.निरी प्रशासन साबाजी नाईक यांच्या सुचनांप्रमाणे सहा.पो. निरी. दर्शन पाटील, संदिप भालेराव, पो.हवा. वाघ, सचिन कदम, जाधव, रोहिदास बुधवंत, विकास भामरे, भागवत सौंदाणे, मिलींद बोरसे, घुगे, राजेश कापडी, विलास जरग, पोशि इंगळे, दिलीप सोनावळे, प्रदीप गिते यांच्या पथकाने केली आहे.

## पेण येथे जमिन हादरल्याची घटना

# भूवैज्ञानिकांचे सर्वेक्षण सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील तिलोरे व सुधागड तालुक्यातील महागाव परिसरातील देऊळवाडी, कलाकाराई, भोप्याची वाडी, कवेले वाडी येथे भूगर्भातून आवाज येवून जमिन हादरल्याची घटना काल रात्री 11.30 ते 12.30 वाजताच्या दरम्यान घडली असे नागरिकांनी स्थानिक प्रशासनास कळविले होते. सदर घटना भूकंप नसून याबाबत भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग पुणे यांच्यामार्फत सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. या घटनेची भारतीय हवामान विभाग मुंबई (IMD) नुसार तसेच कोयनानगर जि.सातारा येथील भूमापन केंद्र येथे भूकंपाची नोंद झाली नसल्याचे आढळून आले आहे. या ठिकाणी तहसिलदार सुधागड यांनी पाहणी करून नागरिकांना दिलासा दिला आहे. सदर घटनेत काही घरांचे किरकोळ नुकसान झाले असून जिवीतहानी झालेली नाही. या ठिकाणच्या अधिक सर्वेक्षणासाठी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग पुणे यांना सदर ठिकाणी सर्वेक्षण करण्यास विनंती करण्यात आलेली आहे. तरी नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

# पोस्को स्टीलतर्फे दहिवलीतील महिलांना उद्योजकतेचे प्रशिक्षण








दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बोरघर : शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरण, आरोग्य, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या वतीने दहिवली परिसरातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी दोन महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले, ज्यामध्ये अहिल्या महिला मंडळ, पेण येथे अभ्यासदौरा आणि नव्याने सुरु केलेल्या उद्योगासाठी भांडवल स्वरुपात कापड वाटप समारंभ या दोन उपक्रमांचा समावेश होता. यामधून महिलांना उद्योगसंधी, स्वयंरोजगाराचे महत्त्व आणि आर्थिक सक्षमीकरण यांची माहिती देण्यात आली. दहिवली आणि परिसरातील पाच गावांतील १७ महिलांना अहिल्या महिला मंडळाच्या अभ्यासदौऱ्यात सहभागी होण्याची संधी मिळाली. या भेटीदरम्यान महिलांना व्यवसाय विकास, उद्योजकतेच्या संधी आणि शाश्वत उपजीविकेच्या विविध पर्यायांबद्दल सखोल मार्गदर्शन मिळाले.

या अभ्यासदौऱ्याचा मुख्य उद्देश महिलांना स्वयंरोजगार आणि लघुउद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने प्रेरणा देणे हा होता. "Seeing is believing" या तत्त्वावर आधारित या भेटीदरम्यान, महिलांना एक यशस्वी महिलांनी सुरु केलेला व्यवसाय प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. यामध्ये त्यांनी व्यवसायातील आव्हाने, संघटनात्मक कामकाज आणि नवीन उद्योजकीय संधी यांचा थेट अनुभव घेतला. पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या प्रयत्नांमुळे या महिलांना नव्या व्यवसाय संकल्पनांचा विचार करण्याची प्रेरणा मिळाली.

अभ्यासदौऱ्याबरोबरच, पोस्को महाराष्ट्र स्टीलने दहिवली गावातील महिलांना नव्याने सुरु केलेल्या उद्योगासाठी भांडवल स्वरुपात ३५०० मीटर कापडाचे वाटप केले. या कापडाचा उपयोग कापडी पिशव्या तयार करण्यासाठी केला जाईल. या उपक्रमामुळे महिलांना स्वयंरोजगार निर्माण करण्याची संधी मिळेल आणि पर्यावरणपूरक व्यवसायांना चालना मिळेल. यामुळे महिलांना आपला व्यवसाय सुरू करता येईल आणि आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने मोठे पाऊल उचलता येईल. हा कार्यक्रम १९ फेब्रुवारी रोजी पोस्को महाराष्ट्र स्टीलचे वरिष्ठ अधिकारी श्री. जी युन पार्क आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या संधीबद्दल महिलांनी उत्साह व्यक्त करत पोस्कोच्या या उपक्रमामुळे त्यांना उद्योजकतेच्या दिशेने पहिले पाऊल टाकण्याची प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. सहभागी महिलांनी व्यक्त केलेले काही अनुभव पुढीलप्रमाणे होते – "पोस्कोचा हा उपक्रम आम्हाला नवीन दिशा दाखवणारा आहे," "या अभ्यासदौऱ्यात आम्हाला एका यशस्वी महिलांनी चालवलेल्या संस्थेचा अनुभव घेता आला," तसेच "कापडाच्या मदतीने आम्हाला आमचा व्यवसाय सुरू करता येईल," आणि "व्यवसाय सुरू करताना येणाऱ्या अडचणी आणि त्यावर मात करण्याचे मार्ग शिकता आले."

पोस्को महाराष्ट्र स्टील नेहमीच महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबवत असते. ग्रामीण महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवणे आणि महिलांना स्वावलंबी होण्यासाठी प्रेरित करणे हे पोस्कोचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

## वर्टेक्स सॉलिसिटर बिल्डिंगला लागलेल्या आगीची घटना

# नागरी संरक्षण दलाच्या वतीने जनजागृती



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील "वर्टेक्स सॉलिसिटर" या इमारती मध्ये काही दिवसांपूर्वी आग लागली होती. स्थानिक रहिवाश्यांचे नशीब बलवत्तर म्हणुया जिवितहानी झाली नाही परंतू मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली.

शिवजयंतीचे ३९५ वर्ष साजरे झाले या दिनाचे औचित्य साधून नागरी संरक्षण दल, नवी मुंबई समूह ठाणे उपनियंत्रक विजय जाधव, सहाय्यक उपनियंत्रक दिपा घरत व अन्य यांच्या पुढाकाराने वर्टेक्स सॉलिसिटर इमारती मधील सदनिका धारकांसाठी सायंकाळी प्रथमोपचार, आणिबाणी उचलपद्धती, अग्निशमक साहित्य, उपलब्ध साहित्य, आग विझविण्याचे साहित्यांचा वापर प्रात्यक्षिक सादर केले. खऱ्या अर्थाने जनजागृती करत छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना केली.

या प्रसंगी प्रमुख पदाधिकारी म्हणून उपमुख्य क्षेत्ररक्षक बिमल नथवानी, विभागीय क्षेत्ररक्षक कल्याण विभाग शकुंतला राय, विभागीय क्षेत्ररक्षक डोंबिवली विभाग हनुमान चौधरी तसेच नागरी संरक्षण दल तर्फे नितीन कापसे, योगेश बुडूक, निरंत धनके, चिराग नथवानी, रंजना मुखेडकर, स्वाती गीमोणकर, लीना ढोणे व सुहास पवार हे स्वयंसेवक प्रात्यक्षिकसाठी उपस्थीत होते.

# 'इंडिया प्राइड बुक ऑफ रेकॉर्ड्स'

## पुरस्काराने सुनील इंगळे सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण: लेवा पाटीदार समाजातील आदरणीय व्यक्तिमत्व लेवा भूषण सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते समाजसेवक पत्रकार व नेत्रदान सोबत देहदान चळवळीचे पुरस्कर्ते सुनील इंगळे यांना इंडिया प्राउड बुक ऑफ रेकॉर्ड्स हा पुरस्कार संबंधित इंटरनॅशनल संस्थेचे कवी कलाध्यापक व्याख्याते श्री संदीप ईश्वर पाटील सर यांच्या शुभहस्ते व सोबत प्राध्यापक जयंत राणे व योगाचार्य प्रमोद शिंदे हे उपस्थित होते. नेहमीच निष्काम कर्मयोगी कार्यात दखलपात्र कार्य केल्याबद्दल ते या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. राष्ट्रभक्तीचे ज्योत तेवत ठेवणे समर्पित भावनेने निरपेक्षपणे सेवावृत्ती होऊन कर्मयोग करणे सहकार्यांना प्रोत्साहित करून नवचैतन्य निर्माण करणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. नेत्रदान व देहदानाचे ते पुरस्कर्ते असून यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. इंगळे यांचे सामाजिक काम हे दैदित्य मान आणि जबरदस्त असून



नेहमीच ते स्वयंस्फूर्तीने समाजकार्यात झोकून देऊन कार्यरत असतात विविध संस्थांनी त्यांच्या या निरपेक्ष समाजसेवेची निर्भीड पत्रकारितेची दखल घेऊन अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वास 65 पेक्षा अधिक राज्यस्तरीय पुरस्काराने व एका राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, या यशाबद्दल सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात त्यांचे विशेष अभिनंदन होत आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024